सोमवार, ९ मार्च २०१५
www.epunyanagari.com
पुण्य नगरी

## विद्युल्लता २०१५ छायाचित्र प्रदर्शन

जागतिक महिला दिनानिमित्त फोटो सर्कल सोसायटी व ठाणे महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'विद्युल्लता २०१५' छायाचित्र प्रदर्शन ठाणे कलाभवन येथे भरवण्यात आले आहे. यंदा या प्रदर्शनाचे चौथे वर्ष असून, फोटो सर्कल सोसायटीच्या १२ महिलांनी सामाजिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या विविध महिलांच्या कार्याचा आढावा घेत छायाचित्रांच्या माध्यमातून बंदिस्त केला आहे.